# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. १८ //स्थायी समिती विशेष सभेचे कार्यवृत्त // दिनांक ३०/१०/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि३०/१०/२०१९ बुधवार रोजी सकाळी११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पदाचे निवडीकरीता मा.डॉ.अविनाश ढाकणे, पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी जळगांव जिल्हा जळगांव यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. डॉ.अविनाश ढाकणे, पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी जळगांव जिल्हा जळगांव**.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अड.हाडा शुचिता अतुलसिंह | ९ | सोनवणे मुकूंदा भागवत |
| २ | पोकळे दिलीप बबनराव | १० | पाटील राजेंद्र झिपरु |
| ३ | कोल्हे प्रविण रामदास | ११ | देशमुख प्रतिभा गजानन |
| ४ | खडके सुनिल वामनराव | १२ | काळे रेश्मा कुंदन |
| ५ | सनकत चेतन गणेश | १३ | भंगाळे विष्णु रामदास |
| ६ | बालाणी भगतराम रावलमल | १४ | बरडे नितीन मनोहर |
| ७ | ढेकळे सदाशिव गणपत | १५ | शेख सैईदा युसुफ |
| ८ | दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | | |

सदर सभेस उपायुक्त श्री.मिनानाथ दंडवते, मुख्यलेखापरिक्षक, श्री.संतोष वाहुळे, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

**नगरसचिव :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम - २०(२) व २०(५) मधील तरतुदीनुसार महासभा ठराव क्र.२१० दिनांक.२५/०९/२०१९ अन्वये १६ सदस्यीय स्थायी समितीचे गठन करणेंत आले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम - २१ (१) चे तरतुदीनुसार व महाराष्ट्र महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांच्या सभापती यांची निवडणुक घेणे) नियम - २००७ व दिनांक १२ डिसेंबर २००८ च्या अधिसुचनेनुसार स्थायी समितीचे सभापती पदासाठी स्थायी समितीची विशेष सभेची तारीख , वेळ तसेच सभेचे पिठासीन अधिकारी नियुक्त करणेकामी महानगरपालिकेच्या पत्र क्र नसका /१०७९/२०१९ दि.२७/०९/२०१९ चे संदर्भानुसार मा.विभागीय आयुक्त नाशिक यांना प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता. त्यानुसार मा.विभागीय आयुक्त साहेब नाशिक विभाग नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र क्र. नपा २/१/३७५३८, ३७५४०/२०१९ दि.२२/१०/२०१९ अन्वये पिठासीन अधिकारी म्हणुन मा.जिल्हाधिकारी, जळगांव यांना पदनिर्देशित केलेले असुन पिठासीन अधिकारी यांचे संमतीने दि.३०/१०/२०१९ रोजी विशेष स्थायी समिती सभेची सुचना निर्गमीत करुन सर्व स्थायी समिती सदस्यांना वितरीत करणेंत आलेल्या आहे. विषयसुचीवरील निवडीचे घोषीत कार्यक्रमानुसार दि.२३/१०/२०१९ बुधवार ते दि.२४/१०/२०१९ गुरुवार या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ०४.०० वाजेपावेतो कोरे नामनिर्देशन पत्र वितरीत करणे तसेच दि.२३/१०/२०१९ बुधवार ते दि.२४/१०/२०१९ गुरुवार या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ४.०० वाजेपावेतो नामनिर्देशन पत्र दाखल करणेबाबत मुदत देण्यात आलेली होती. सदर मुदतीत स्थायी समिती सभापती पदासाठी **एकुण ०४** नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले आहेत **१) पोकळे दिलिप बबनराव** यांचे एकुण ०१ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असुन नामनिर्देशन पत्रावर **सुचक - सनकत चेतन गणेश** तर **अनुमोदक - काळे रेश्मा कुंदन** हे आहेत, **२) हाडा शुचिता अतुलसिंह** यांचे एकुण ०१ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असुन नामनिर्देशन पत्रावर **सुचक - सोनवणे मुकुंदा भागवत** तर **अनुमोदक - देशमुख प्रतिभा गजानन** हे आहेत, **३) बालाणी भगतराम रावलमल** यांचे एकुण ०१ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असुन नामनिर्देशन पत्रावर **सुचक - ढेकळे सदाशिव गणपत** तर **अनुमोदक - खडके सुनिल वामनराव** हे आहेत, **४) पाटील राजेंद्र झिपरु** यांचे एकुण ०१ नामनिर्देशन पत्र प्राप्त झालेले असुन नामनिर्देशन पत्रावर **सुचक - कोल्हे प्रविण रामदास** तर **अनुमोदक - दारकुंडे नवनाथ विश्वनाथ** हे आहेत.

सभापती पदासाठी आलेली **एकुण ०४** नामनिर्देशनपत्रे छाननीसाठी मा.पिठासीन अधिकारी यांचेकडेस सादर करण्यांत येत आहेत.

**मा.पिठासीन अधिकारी** :- सभेस उपस्थित उपायुक्त, अधिकारी-कर्मचारी, पत्रकार बंधू व सर्व स्थायी समिती सदस्यांचे मी स्वागत करीत आहे. नगरसचिव यांना प्राप्त झालेल्या नामनिर्देशित पत्रांची छाननी केली असता सर्व नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे घोषीत करण्यात येत आहे. सभापती निवडी संबंधात शासनाने केलेल्या नियमांमधील नियम क्र.५ (३) चे तरतूदीस अनुसरुन उमेदवारास आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्यासाठी त्यांना १५ मिनिटांचा कालावधी देण्यात येत आहे. यावेळेस घडयाळात सकाळी ११.०८ वाजलेले आहेत. येथून १५ मिनिटांचा कालावधी मोजण्यात येईल. त्यानुसार सकाळी ११.२३ वाजेपावेतो उमेदवार आपली उमेदवारी मागे घेऊ शकतील.

**मा.पिठासीन अधिकारी** :- उमेदवारी मागे घेणेसाठी दिलेल्या १५ मिनिटांच्या कालावधीत **१) श्री. बालाणी भगतराम रावलमल २) श्री.पोकळे दिलीप बबनराव ३)श्री. पाटील राजेंद्र झिपरु** हया उमेदवारांनी आपली उमेदवारी माघारी घेतलेली असल्याने **सौ. हाडा शुचिता अतुलसिंह** हे एकमेव उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र उरलेले असल्याने मी डॉ.अविनाश ढाकणे, पिठासीन अधिकारी, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव **सौ. हाडा शुचिता अतुलसिंह** यांची स्थायी समिती सभापती पदी बिनविरोध निवड झाल्याचे घोषित करीत आहे.

निवड झालेल्या नुतन सभापती **सौ. हाडा शुचिता अतुलसिंह** यांचे प्रशासनातर्फे अभिनंदन व स्वागत करण्यात येत आहे.

राष्ट्रगीता नंतर येणे प्रमाणे स्थायी समिती सभापती निवडीची सभा शांततेत पार पडली.

**सही/-**
**(डॉ.अविनाश ढाकणे)**
**पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी**
**जळगांव जिल्हा,जळगांव**